Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 150– 155

DOI: 10.5281/zenodo.10115235

Original Research Article

# भारत देशातील महान नेते महात्मा गांधी

प्रा. डॉ. मधुकर विठोबा जाधव

सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग, वाय. सी. कॉलेज हलकर्णी, ता. चांदगड जि. कोल्हापूर ४१६५५२ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: mvjhistory12@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 25 October, 2023 | Published: 26 October, 2023

## प्रस्तावना

महात्मा गांधी हे भारत देशातील आदर्श नेते होत. समग्र भारतीयांच्या दृष्टीने महात्मा गांधी यांचे विचार व त्यांची अंमलबजावणी फार महत्वाची आहे. महात्मा गांधी यांनी आपल्या विचारातून थोर तत्वज्ञान मांडले. महात्मा गांधी यांचे विचार समजून घेऊन त्या दिशेने वाटचाल करणे गरजेचे आहे. महात्मा गांधीजींनी भारत देशाला स्वातंत्र्यच मिळवून दिले नाहीतर आपल्या देशाला व सर्व मानव जातीला उदात्त व शाश्वत मुल्ये दिली.जगाच्या इतिहासातील पहिले नेते आहेत की त्यांनी स्वातंत्र्यलढ्यासाठी अहिंसात्मक मार्गाने देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले.जगाच्या इतिहासावर प्रकाश टाकल्यानंतर असे लक्षात येते की ज्यांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले आसे नेते. नंतर देशाचे प्रमुख बनले. अमेरिकेच्या स्वातंत्र्य युद्धामध्ये जॉर्ज वॉशिंग्टन हेच तेथील प्रमुख होते. स्वातंत्र्यानंतर तेच अमेरिकेचे अध्यक्ष बनले. चीनचे नेते माओ-त्से-तुंग कम्युनिस्ट क्रांतीनंतर राष्ट्राध्यक्ष बनले. परंतु महात्मा गांधी हे जगातील पहिले नेते होते की ज्यांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले परंतु स्वातंत्र्यानंतरच्या काळात सत्तेच्या जवळपास देखील कधी गेले नाहीत हे त्यांचे श्रेष्ठत्व होय.

## विषय विवेचन

### ग्राम राज्याची संकल्पना

महात्मा गांधीजींच्या तत्त्वज्ञानामध्ये विकेंद्रीकरणावर भर होता. सत्तेचे व अधिकाराचे विकेंद्रीकरण करून सर्व राज्यव्यवस्था सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहोचली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. भारत देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच ग्राम राज्याची संकल्पना महात्मा गांधीजींनी सर्वांच्या समोर ठेविली. साधेपणा हे महात्मा गांधीजींनी आपले मुलतत्व मानले. त्यांच्या विचारात सत्य हाच परमेश्वर होता. ते सत्याचरण आणि सदाचरण हीच परमेश्वर भक्ती असे मनात असत. समाज हा शहरात केंद्रित न होता तो खेड्यातून विभागला पाहिजे. माणसे एकमेकांच्या जवळ आली पाहिजेत. ग्रामराज्य, रामराज्य आणि स्वराज्य यांचे समन्वयीत संतुलन ही काळाची गरज आहे. हे त्यांना माहिती होते.

**सर्वधर्मसमभाव**

आदिवासी सेवा संघ, हरिजन सेवा संघ, कुष्ठ निवारण संघ इ. रूपाने त्यांच्या विचारांचे मूर्त रूप समोर येते. आजच्या या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात आपल्या विवेकाची दिशा ठरविण्याचे श्रेय महात्मा गांधीजींच्या व्रतस्थ मार्गालाच द्यावे लागेल. महात्मा गांधींनी भारत देशाला दिलेला सर्वश्रेष्ठ विचार म्हणजे सर्वधर्मसमभाव होय. महात्मा गांधीजींनी या विचाराला भक्कम तात्विक अधिष्ठान दिले. विशाल अशा भारत देशात या तत्वाला विशेष स्थान आहे. कारण जगातील सर्व धर्माचे व वंशाचे लोक येथे राहतात. महात्मा गांधी स्वातंत्र्यानंतर सत्तेपासून दूर राहून राष्ट्र उभारणीच्या कार्यासाठी विधायक मार्गाने जात होते.

**हरिजन सेवक संघ**

हरिजन सेवक संघ ही अस्पृश्यता निवारणासाठी महात्मा गांधीजींच्या प्रेरणेने स्थापन झालेली संस्था होय. २५ सप्टेंबर १९३२ रोजी मुंबई येथे भारतीयांची एक सभा झाली. या सभेमध्ये अस्पृश्यता नष्ट करण्यासंबंधी एक ठराव संमत करण्यात आला. त्यांनतर पाच दिवसांनी म्हणजे ३० सप्टेंबर १९३२ रोजी मुंबई येथे या संदर्भात आणखी एक सभा भरली व त्यात अखिल भारतीय अस्पृश्यताविरोधी संघ ही संस्था स्थापन केल्याचे जाहीर करण्यात आले. दिल्ली येथे या संघाचे प्रमुख कार्यालय ठेवण्याचे निश्चित करण्यात आले. या सार्वजनिक विहिरी, धर्मशाळा, रस्ते, शाळा, स्मशानभूमी व सार्वजनिक देवालये ही सर्व ठिकाणी हरिजनांकरिता खुली करण्याकरिता लवकरात लवकर व निश्चित पावले उचलणे. शांततेच्या मार्गाने सर्वांचे मन वळविण्यावर भर देण्यात यावा. अशा महत्वकांक्षी सुधारणांचा सामावेश करण्यात आला. संघाने स्वतंत्र प्राथमिक विद्यालये, माध्यमिक शाळा सुरु करून तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षणाची सोय केली. हरिजनांसाठी वसतिगृहे बांधली. औद्योगिक शाळा उघडल्या. वैद्यकीय सेवेसाठी रुग्णालये सुरु केली. महात्मा गांधीजींच्या प्रभावामुळे स्वराज्य संस्थांनी जुन्या विहिरी दुरुस्त करून हरिजनांसाठी त्या खुल्या केल्या. हरिजनांसाठी माहिती आकडेवारी गोळा करणे, पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे याव्दारे संघाच्या कार्याचा प्रसार व प्रचार करणे आणि हरिजनांच्या हस्त व्यवसायास उत्तेजन देणे यावर भर देण्यात आला. महात्मा गांधीजींच्या यंग इंडिया नावाच्या साप्ताहिकाचे संपादन करीत असत. त्यांनी १९३३ मध्ये त्यास साप्ताहिकाचे नाव बदलून हरिजन असे ठेवले. कारण त्यांना असे वाटत होते की राजकीय स्वतंत्र मिळण्याइतकेच अस्पृश्यता निवारण होणे सुध्दा महत्वाचे आहे. भारत देशातील तरुण आणि वृध्द आणि आज कार्यरत असलेल्या व भावी काळात येणा-या पिढ्यांनी या पवित्र कामाला स्वत:ला वाहून घ्यायला हवे. हरिजन हा शब्द हिंदू मध्यम वर्गात आणि राष्ट्रवादी विचारांच्या वर्तमानपत्रांमध्ये खूप लोकप्रिय झाला. सर्व सामान्य व्यक्ती जसे देवाला पुजतात तसे महात्मा गांधीजींच्या विचारांचे पाईक आहेत. त्यांनी अनेक पुस्तके लिहून आपले विचार सर्वापर्यंत पोहोचविले.

**आमचे गाव आमचे सरकार**

आमचे गाव आमचे सरकार अशी महात्मा गांधीजीची संकल्पना होती. भारतातील प्रत्येक खेडं आणि खेडं हे सर्वांगिण दृष्टीने स्वयंपूर्ण असले पाहिजे. स्वयंपूर्ण या शब्दाचा अर्थ म्हणजे जनतेला त्या खेडयात आरोग्य, शिक्षण, सर्वांना काम आदि. सुविधा गावतच असल्या पाहिजेत. याचा अर्थ संपूर्ण गाव समृद्ध असले पाहिजे. माणुस हाच भारताची खरी शक्ती आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीच्या विकासात भारताच्या समृद्धीची बीजे आहेत. ग्रामराज्याची संकल्पना महात्मा गांधीजीनी सर्वाच्या समोर ठेवली.

### सत्तेचे विकेंद्रीकरण

महात्मा गांधीजींच्या विचारात देशाच्या विकेंद्रीकरणावर भर होता. स्वतंत्र भारतामध्ये सत्तेचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे व सर्व शासनव्यवस्था सामान्य जनते पर्यंत पोहचली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. महात्मा गांधीजींनी आचार व विचार यामध्ये कधीही फारकत केली नाही.

### अहिंसक मार्गाने लढा

बॅरिस्टर ही पदवी संपादन करून महात्मा गांधीजी लंडनहून भारतात परत आल्यानंतर राजकोट येथे वकिली सुरू केली. इ. सन १८९३ माली एका कंपनीचे वकिल म्हणुन ते दक्षिण आफिकेला गेले. तेव्हा पासुन खऱ्या अर्थाने ते जागतिक पातळीवर चमकले. तेथे गोऱ्यांनी कृष्णवर्णीयांवर अन्याय व जुलूम चालविला होता आणि त्यांचे मूलभूत हक्क व अधिकार नाकारण्यात आले होते. या सर्व अन्यायाविरोधात महात्मा गांधीजींनी शांततापूर्ण मार्गाने लढा दिला व तो लढा यशस्वी करून दाखविला. प्रथम सत्याग्रहाचा प्रयोग करून अहिंसा मार्गाने आंदोलन यशस्वी करता येते हे त्यांनी जगाला दाखवून दिले. इ. सन १९१४ साली ते भारतात आले व त्यांनी ब्रिटिशांविरोधात सत्याग्रह व अहिंसक मार्गाने लढा चालविला. असहकार, सविनय कायदेभंग, दांडी यात्रा, मिठाचा सत्याग्रह, गोलमेज परिषद, पुणे करार, चले जाव या आंदोलनातुन महात्मा गांधीजींनी रक्ताचा एकही थेंब न सांडता आपल्या देशास स्वातंत्र्य मिळवून दिले.साहस दाखविण्यासाठी साहासी माणसाला शस्त्राची कदापि गरज पडत नाही. हा महात्मा गांधीजींचा सिद्धांत होता आणि याच तत्वानुसार त्यांनी प्रत्येक श्वास घेतला.

### जगातील महान नेते

महात्मा गांधीजी जगातील महान नेते होत.महात्मा गांधी यांच्या विचाराने जग जिंकले.जगाला एक नवी दिशा दाखवली. महात्मा गांधीजींनी आपल्या विचाराने जगाला आपल्या मागे यायला लावले. स्वतःच असं एक नवे शिखर निर्माण केलं. त्या शिखरापर्यंत कोणी पोहचला नाही. महात्मा गांधीजींनी आपल्या भारत देशाला फक्त स्वातंत्र्यच मिळवून दिले नाही तर आपल्या देशाला व सर्व विश्वातील मानव जातीला उदात्त व शाश्वत मूल्ये दिली आहेत. जगाच्या इतिहासातील पहिले व एकमेव नेते आहेत ज्यांनी अहिंसेच्या मार्गातुन स्वातंत्र्यलढा यशस्वी केला. शरीराने काळच्या पडद्याआड गेलेले परंतु विचाराने आपल्यात असणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी एकमेव विभुती आहेत. आपल्या अमुल्य अशा विचाराने प्रत्येक भारतीयांच्या मनामध्ये ज्योत पेटवून जगत आहेत. महात्मा गांधीजीचा 'अहिंसा' हा मंत्र जगाने स्विकारला.

### जीवन हेच एक तत्वज्ञान

महात्मा गांधीजींचे जीवन हेच एक तत्वज्ञान आहे. त्यांचे तत्वज्ञान सत्य, अहिंसा, सत्याग्रह या वैशिष्ट्यांतून स्पष्ट होते. सत्य हे साध्य तर अहिंसा हे साधन होय. आपल्या या ध्येयापासुन महात्मा गांधीजी कधीही बाजूला गेले नाहीत. जेथे सत्य तेथे परमेश्वर असे त्यांचे मत होते. आयुष्यभर त्यांनी सामाजिक नीतिमूल्यांचा आग्रह धारला. त्यांनी **'इंग इंडिया'** या साप्ताहिकातून अहिंसा या तत्वाचे स्पष्टीकरण दिले आहे. महात्मा गांधीजीनी सत्याग्रहाला फार मोठे स्थान दिले. सत्य आणि अहिंसा यांचा समन्वय म्हणजे सत्याग्रह होय. सत्याग्रह म्हणजे सत्यासाठी आग्रह होय. सत्याग्रह करणारा तो सत्याग्रही होय. असहकार, सविनय कायदेभंग, स्वदेशी, हरताळ, बहिष्कार या चळवळी म्हणजे सत्याग्रह होय. या चळवळी म्हणजे महात्मा गांधीजींच्या तत्वज्ञानाचा अविष्कार होय.आधुनिक जगाच्या इतिहासामध्ये महात्मा गांधीजींच्या स्वदेशी चळवळीला सर्वश्रेष्ठ स्थान आहे. महात्मा गांधीजींनी या चळवळीचा उपयोग सामाजिक व आर्थिक

विकासासाठी करून घेतला. लोक स्वदेशी वस्तूचा आग्रह धरू लागले. देश विकासासाठी या चळवळीने मोठा हातभार लावला.

**सर्वसामान्य जनतेचे हित**

समाजातील माणसाच्या मुलभूत गरजा पूर्ण झाल्या पाहिजेत. सत्य, अहिंसा व अपरिग्रह या त्रिसुत्रावर महात्मा गांधी यांचे जीवन आधारलेले होते. समाज सुधारणा चळवळीत महात्मा गांधी यांनी खेड्या कडे चला हा संदेश दिला. शाश्वत विकासासाठी खेड्यातील समाज व्यवस्था सुधारली पाहिजे असे त्यांचे मत होते. गरीब, श्रीमंत ही कमालीची दरी नष्ट होऊन समाज एकसंघ झाला पाहिजे असे त्यांचे विचार होते. त्यासाठी शिक्षण घेतले पाहिजे. महात्मा गांधी म्हणाले होते 'गरीब व्यक्तीचे स्वराज्य हे मला अपेक्षित असलेले स्वराज्य आहे. गरीब व्यक्तीच्या संपूर्ण जीवनासाठी जोपर्यंत अत्यंत आवश्यक असलेल्या मूलभूत गरजांच्या पूर्ततेची हमी मिळत नाही तोपर्यंत ते स्वराज्य पूर्ण स्वराज्य नव्हे.' या महात्मा गांधी यांच्या विचारातुन सर्वसामान्य जनतेचे हित लक्षात येते.

**सामाजिक समता**

हिंदू-मुस्लिम एकतेसाठी महात्मा गांधी यांनी दिलेले योगदान सर्वश्रेष्ठ असे आहे. हरिजन या शब्दाचा सर्व प्रथम प्रयोग महात्मा गांधी यांनी केला. हरिजन, हरिजन सेवक, हरिजन बंधू आदि. नियतकालीके महात्मा गांधी यांनी चालविली. या लिखाणातून त्यांनी स्वातंत्र्याचा व सामाजिक समतेचा विचार मांडला. महात्मा गांधीजींचा आग्रह होता की चारित्र्यसंपन्न समाज निर्माण व्हावा. आदिवासी सेवा संघ, हरिजन सेवा संघ, कुष्ठनिवारण संघ आदिंच्या रूपाने त्यांचे महान कार्य समोर आले. सामान्य माणसातून त्यांनी असामान्य सामर्थ्य उभे केले.

**स्वातंत्र्यलढ्यातून नेतृत्व**

आपल्या स्वातंत्र्यलढ्यातून महात्मा गांधीजींनी जितके नेते निर्माण केले तेवढे जगाच्या इतिहासात कोणत्याही नेत्याला करता आलेले नाहीत.पंडित नेहरू, सरदार वल्लभाई पटेल, नेताजी सुभाषचंद्र बोस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विजयालक्ष्मी पंडित, अच्युतराव पटवर्धन, लालबहादूर शास्त्री, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, क्रांतिसिंह नाना पाटील, नागनाथ आण्णा नाईकवाडी, जी डी. लाड, नानासाहेब गोरे, मधु लिमये असे नेते स्वातंत्र्यलढ्यातून निर्माण झाले. त्यामुळे भारत देशाला हे नेतृत्व अतिशय उपयुक्त ठरले.जिल्हा, तालुका, गाव पातळीवर त्यांनी असे नेते निर्माण केले.यातुन आपणास महात्मा गांधी यांच्या विचाराचा प्रभाव किती खोलवर पडला होता हे लक्षात येते.

**जगातील देशांसाठी प्रेरणादायी**

महात्मा गांधी यांनी **मार्टिन ल्यूथर** यांना प्रेरणा दिली आणि त्यातून अमेरिकेत समान नगरी हक्काची चळवळ सुरू झाली. महात्मा गांधी हे वैश्विक प्रतीक आहेत. त्यांचे विचार संपूर्ण जगाला पटले आहेत. महात्मा गांधी यांची आठवण म्हणून अफ्रिकन सरकारने त्यांच्या नावाचे नाणे काढले आहे. अफ्रिकन नेते **एकिझे** यांनी नाण्याचे अनवरण केले तेव्हा ते म्हणाले 'महात्मा गांधी हे असाधारण व्यक्तिमत्व होते. त्यांनी भारतालाच नाही तर दक्षिण आफ्रिकेला सत्याग्रहाच्या माध्यमातुन स्वातंत्र्य मिळवूण दिले. भारताबरोवरच ते आफ्रिकेचे महान सुपूत्र आहेत.' अमेरिकेचे **राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा** यांचे गांधी प्रेम सर्वश्रुत आहे. जेव्हा ते भारत भेटीवर आले होते. तेव्हा त्यांनी मुंबईतील मणिभवन या महात्मा गांधीजींच्या वास्तूला भेट दिली. तेव्हा त्यांनी असे गौरोवोद्गार काढले की 'महात्मा गांधी हे जगाचे नायक होते. महात्मा गांधीजी सत्य व अहिंसेचे पुजारी होते' नुकतीच बराक ओबामांची पत्नी मिशेल ओबामा यांनी असे नमुद केले की सहिष्णुता आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी महात्मा गांधीजींनी घालून दिलेल्या आदर्शाचे पालन करतच ओबामा आज

परिवर्तनाचे दूत बनले आहेत. जगातील अनेक देशांसाठी प्रेरणादायी असणारे महात्मा गांधी यांचा गौरव करताना जगातील सर्वश्रेष्ठ शास्त्रज्ञ **आल्बर्ट आईन्स्टाईन** म्हणाले होते "महात्मा गांधी या भूतलावर होऊन गेले यावर पुढील पिढ्यांचा विश्वास बसणार नाही एवढे ते महान व्यक्तिमत्व होत". आफ्रिका, अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, स्वित्झर्लंड, रशिया अशा अनेक देशातील संस्थांमध्ये व विद्यापीठामध्ये महात्मा गांधीजी यांच्या संदर्भातील अभ्यासक्रम व संशोधन सूरू आहे. महात्मा गांधी प्रेमापोटी स्वतःच्या रक्ताचा वापर करून महात्मा गांधीजींचे छायचित्र रेखाटणारे गांधी भक्त ही जगात आहेत.

**स्वच्छ भारत अभियान**

जगाला विवेकाची दिशा दिली. 'शिस्त आणि स्वच्छता' या दोन घटकांशिवाय कोणतेही राष्ट्र आधुनिक होण्यास सुरूवात होऊ शकत नाही हे महात्मा गांधीजींचे विचार होते. या विचाराला सत्य रूप देण्यासाठी **भारत** सरकारने २ ऑक्टोंबर २०१४ वर्षापासुन महात्मा गांधीजींचे स्वच्छ भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी **'स्वच्छ भारत अभियान'** हाती घेण्यात आले आहे.

**आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन**

महात्मा गांधी यांची जयंती संयुक्त राष्ट्रसंघ गेली अनेक वर्षे **आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन** म्हणून साजरी करत आहे. महात्मा गांधी यांचे तत्वज्ञान जगाला पटले आहे. भारतीयांना अभिमान वाटावा अशी ही गोष्ट आहे. आधुनिक जगाच्या इतिहासावर महात्मा गांधी यांचा जितका प्रभाव आहे तितका अन्य कोणत्या नेत्यांचा नाही.

**सारांश**

आजही आपण त्यांच्या अनेक आदर्श पैलूंचे अनुकरण करत जगत आहोत. महात्मा गांधीजींनी भारतीय स्वातंत्र्यलढा हाती शस्त्र न घेता अहिंसेच्या मार्गाने लढविला हे जगाच्या इतिहासातील पहिले असे आदर्श उदाहरण होय. त्यांनी जगाला एक श्रेष्ठ विचार दिला. अहिंसा हे त्यांच्या स्वातंत्र्य चळवळीचे मुख्य साधन होते. महात्मा गांधीजीनी दिलेला अहिंसेचा संदेश जगात सर्वश्रेष्ठ आहे. जगामध्ये आजही हिंसक आक्रमणे होत आहेत. या हिंसक वातावरणातुन जगाला व सर्व मानव जातीला मुक्त करण्याचे सामर्थ्य त्यांच्या अहिंसा संदेशात आहे. स्त्री, पुरूष, गरीब, श्रीमंत या सर्वांना समान मानणारे महात्मा गांधी महामानव होत. स्त्री वर्गाला भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी करून घेऊन त्यांना सन्मानाचे स्थान देणारे महात्मा गांधी श्रेष्ठ नेते होत.

**संदर्भ सूची**

१. महात्मा गांधी, माझे सत्याचे प्रयोग, अहमदाबाद, २०१२.
२. महात्मा गांधी, हिंद स्वराज्य, नई दिल्ली, १९९२.
३. चतुर्वेदी त्रि. ना. (संपा), साहित्य अमृत, महात्मा गांधी विशेषांक, नई दिल्ली, २०२०.
४. कुलकर्णी अ. रा, भारतीय स्वातंत्र्य आंदोलन, पुणे, १९६६.
५. वैद्य सुमन व कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास, नागपूर, १९९४.
६. गोवर बी. एल व बेल्हेकर एन. के, आधुनिक भारताचा इतिहास, नवी दिल्ली, १९९५.
७. बिपन चंद्र, इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेंडन्स, काळे एम. व्ही. (अनु), पुणे, २००३.
८. दीक्षित नी. सी, आधुनिक भारत, नागपूर, २००३.

९. मोरे सदानंद, लोकमान्य ते महात्मा, (खंड १ व २), पुणे, २००७.
१०.तळवळकर गोविंद, सत्तांतर १९४७, मुंबई, १९९७.